MHBU130016662019

दाखल तारीख – १३/०८/२०१९

नोंदणी तारीख – १३/०८/२०१९

निकाल तारीख – २३/०६/२०२६

कालावधी– ०६ वर्षे १० महिने १० दिवस

**चिखली येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी आय. ए. वाय. ए. खान यांचे समोर)**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ९९५/२०१९** **निशाणी क्र. २७**

महाराष्ट्र शासन तर्फे

पोलीस ठाणे, चिखली ... **अभियोग पक्ष**

ता. चिखली, जि. बुलडाणा.

**विरुध्द**

१. उत्तम तुकाराम काठोळे

वय – ५२ वर्ष, धंदा– शेती,

२. अमोल उत्तम काठोळे

वय – ३६ वर्ष, धंदा– शेती,

३. लक्ष्मण उत्तम काठोळे

वय – ३२ वर्ष, धंदा– शेती,

४. रविंद्र सुरेश काठोळे

वय – ३५ वर्ष, धंदा– शेती,

सर्व रा. खैरव, ता. चिखली, जि. बुलडाणा ... **आरोपी**

**खटला– भारतीय दंड संहिता कलम**

**२९४, ३२३ व ५०६ सह कलम ३४ अन्वये**

---

मो. बशीर मो. नसीर – अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता

के. एस. हनवते – आरोपींतर्फे वकील

---

**न्यायनिर्णय**

(दि. २३/०६/२०२६ रोजी जाहिर)

आरोपींना सदर खटल्यामध्ये भारतीय दंड संहिता कलम २९४, ३२३ व ५०६ सह कलम ३४ अन्वये संपरिक्षीत करण्यात आले.

२. **अभियोग पक्षाचे थोडक्यात म्हणणे खालीलप्रमाणे –**

दिनांक ११/०७/२०१९ रोजी फिर्यादी सारजुबा मोतीराम साळवे हे त्यांच्या घरुन गट क्र. ३३०, तेल्हारा शिवार येथे दुपारी

०४.३० वाजता सरकारी रस्त्याने जात असतांना त्यांचा चुलत भाऊ आरोपी क्र. १ उत्तम काठोळे हा आला व म्हणाला की, ''हा रस्ता माझा आहे, तु या रस्त्यावरुन जाऊ शकत नाही'' असे म्हणून फिर्यादीसोबत वाद घातला आणि त्याला शिवीगाळ केली. त्यावेळी आरोपी क्र. १ ते ४ तेथे धावत आले व त्यांच्या वडिलांसोबत भांडण करतो का असे म्हणून शिवीगाळ केली. त्यावेळी, भांडणाचा आवाज ऐकुन त्यांची मुले रमेश व ज्ञानेश्वर हे भांडण सोडविण्यासाठी आली असता त्यांना देखील सर्व आरोपींनी मारहाण केली. त्यांच्या डाव्या डोळ्याला काही तरी मारल्यामुळे बरोबर दिसत नाही व मुलांना मुकामार लागला. त्यावेळी, आरोपींनी त्यांना ''मायचा फोदा, मायचा चिना झवा, तुझ्या मायची गांड, तुमच्या बायकोच्या उरावर बसतो'' अशी अश्लील शिवीगाळ केली तसेच तु पुन्हा या रस्त्यावर आला की जिवाने मारुन टाकीन अशी धमकी दिली. त्यावेळी, संतोष सपकाळ हे उपस्थित होते. त्यानंतर, फिर्यादीने घटनेची तक्रार पोलीस स्टेशन, चिखली येथे दाखल केली.

३. सदर फिर्यादवरुन आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता कलम २९४, ३२३ व ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा दाखल झाला. तपासिक अंमलदार पो.हे.कॉ. नामदेव खवले यांनी घटनास्थळ पंचनामा तयार केला. साक्षीदारांची तपास टिपणे नोंदविली. जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले.

तपासाअंती आरोपींविरुद्ध वरील कलमान्वये न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

**४.** मी आरोपींविरुद्ध भारतीय दंड संहिता कलम २९४, ३२३ व ५०६ सह कलम ३४ प्रमाणे नि. १७ वर गुन्हयाचा तपशिल नोंदविला. सदरचा तपशिल आरोपींना त्यांच्या बोलीभाषेत वाचून व समजावून सांगण्यात आला. आरोपींनी गुन्हा मान्य नसल्याचे सांगितले व संपरिक्षेला सामोरे जाण्याचे ठरविले.

**५.** आरोपींविरुद्ध गुन्हा सिद्ध करण्यासाठी अभियोग पक्षातर्फे फिर्यादी रमेश सरजुबा कोठाळे (सा.क्र.१) यांना निशाणी क्र. २४ ज्ञानेश्वर सरजुबा कोठाळे (सा.क्र.२) यांना निशाणी क्र. २५ वर तपासले.

**६.** अभियोग पक्षाच्या पुराव्यामधून आरोपीविरुध्द दोषदर्शक पुरावा न आल्याने आरोपीचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ नुसार जबाब नोंदविण्यात आला नाही.

**७.** माझ्या विचाराधीन उद्भवलेले मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

| अ.नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिद्ध केले का की, दिनांक ११/०७/२०१९ रोजी दुपारी ०४.३० वाजताचे सुमारास मौजे खैरव, ता. चिखली, जि. बुलडाणा येथे आरोपींनी आपसात संगनमत करुन, फिर्यादी सरजुबा काठोळे व त्यांची दोन मुले यांना सार्वजनिक ठिकाणी अश्लील शिवीगाळ केली आणि त्यायोगे भा. दं. वि. कलम २९४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | नाही. |
| २. | अभियोग पक्षाने हे सिद्ध केले काय की, वर नमूद वेळी, ठिकाणी व दिवशी, आरोपींनी आपसात संगनमत करुन, फिर्यादी व त्याच्या दोन मुलांना मारहाण करुन ईच्छापूर्वक दुखापत पोहोचविली आणि त्यायोगे भा. दं. वि .कलम ३२३ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | नाही. |
| ३. | अभियोग पक्षाने हे सिद्ध केले काय की, वर नमूद वेळी, ठिकाणी व दिवशी, आरोपींनी आपसात संगनमत करुन, फिर्यादीला दमदाटी करुन फौजदारीपात्र धाकदपटशा केला आणि त्यायोगे आरोपींनी त्याप्रमाणे भारतीय दंड | नाही. |

| | | |
|---|---|---|
| | संहिता कलम ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | |
| ४. | आदेश काय ? | आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## कारणमिमांसा

८. प्रस्तुत कामी खटल्यातील कागदपत्रांची छाननी केली आणि सरकारतर्फे मो.बशीर मो.नसीर व आरोपीतर्फे श्री. के. एस. हनवते यांचा युक्तीवाद ऐकला.

**मुद्दा क्र. १ ते ३ बाबत** :

९. मुद्दा क्र. १ ते ३ हे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे पुराव्यावरील विश्लेषणाची पुनरावृत्ती टाळण्यासाठी मी त्यावर एकत्रितपणे चर्चा करीत आहे.

१०. अभियोग पक्षाने आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी रमेश सारजुबा कोठाळे (सा.क्र.१) याला नि. २४ वर तपासले आहे. त्याने त्याच्या साक्षीत नमूद केले की, मयत सरजुबा मोतीराम काठोळे हे त्यांचे वडील होते.

घटना कोठे व काय घडली हे त्यांना माहिती नाही. आरोपींसोबत किरकोळ वाद झाला होता. याशिवाय काहीही घडले नव्हते. घटनेच्या दिवशी आरोपींनी त्याला, त्याच्या भावाला व वडिलांना मारहाण केली असे घडले नसल्याचे सांगतात.

**११.** अभियोग पक्षाने आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी ज्ञानेश्वर सारजुबा कोठाळे (सा.क्र.२) याला नि. २५ वर तपासले आहे. त्याने त्याच्या साक्षीत नमूद केले की, मयत सरजुबा मोतीराम काठोळे हे त्यांचे वडील होते. घटना कोठे व काय घडली हे त्यांना माहिती नाही. आरोपींसोबत किरकोळ वाद झाला होता. याशिवाय काहीही घडले नव्हते. घटनेच्या दिवशी आरोपींनी त्याला, त्याच्या भावाला व वडिलांना मारहाण केली असे घडले नसल्याचे सांगतात.

**१२.** प्रस्तुत प्रकरणातील जखमी साक्षीदार हे पुर्णपणे फितुर होवून त्यांनी अभियोग पक्षाच्या कथनास सहाय्य केले नाही. त्या दोन्ही साक्षीदारांनी घटना घडल्याचे नाकारले आहे. उलटपक्षी त्यांनी त्यांच्या साक्षीपुराव्यात त्यांच्या जबाबातील अधोरेखांकीत भाग–अ मधील मजकूर पोलीसांनी का नमुद केला याचे कारण सांगु शकले नाही. प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादी सारजुबा मोतीराम काठोळे हे मयत झाल्याने त्यांची साक्ष नोंदविण्यात आली नाही. त्यामुळे, फिर्याद सिध्द झाली नाही.

**१३.** पटलावरील एकंदर पुराव्याचे अवलोकन करता फिर्यादी/जखमी साक्षीदारांची साक्ष गुन्ह्याबाबत आरोपींकडे स्पष्टपणे नामनिर्देश करीत नाही. या पार्श्वभुमीवर सदर प्रकरणी तडजोड पुरसीस निशाणी क्र.२३ विचारात घेणे आवश्यक आहे. त्यावरुन असे दिसते की, फिर्यादी/जखमी साक्षीदार व आरोपींमध्ये तडजोड झाली असून फिर्यादी/जखमी साक्षीदारांना खटल्यात रस उरला नाही. त्याचप्रमाणे प्रस्तुत कामी फिर्यादी/जखमी साक्षीदार व आरोपींच्यामध्ये तडजोड झाली असल्यामुळे इतर साक्षीदारांचा पुरावा दुय्यम ठरतो.

**१४.** एकूण विश्लेषण पहाता असे नमुद होते की, दिनांक ११/०७/२०१९ रोजी दुपारी ०४.३० वाजताचे सुमारास मौजे खैरव, ता. चिखली, जि. बुलडाणा येथे आरोपींनी आपसात संगनमत करुन, फिर्यादी व त्याची दोन मुले यांना अश्लील शिवीगाळ केली, मारहाण करुन ईच्छापूर्वक दुखापत पोहोचविली आणि जिवे मारण्याची धमकी दिली या बाबी अभियोग पक्षाने सिद्ध केल्या नाहीत. म्हणून मी मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्र. ४ बाबत –**

**१५.** तरी हे स्पष्ट होते की, अभियोग पक्ष आरोपींविरुद्ध भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम २९४, ३२३ व ५०६ सह कलम ३४ चे घटक सिद्ध करण्यास असमर्थ ठरला आहे. तरी आरोपी क्र.१ ते ४ हे त्यातून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत.

**१६.** त्याचप्रमाणे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(१)(अ) प्रमाणे या न्यायनिर्णयाविरोधात अपिल दाखल झाल्यास त्यात हजर राहण्याची हमी म्हणून आरोपीनी सहा महिन्यांच्या कालावधीसाठी प्रत्येकी रु.१५,०००/– चे वैयक्तीक बंधपत्र व जामीनपत्र द्यावे असा आदेश देणे उचित ठरेल. अंतिमतः मुद्दा क्र. ४ च्या उत्तरादाखल मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

**१.** आरोपी क्र. १ उत्तम तुकाराम काठोळे, आरोपी क्र. २ अमोल उत्तम काठोळे, आरोपी क्र. ३ लक्ष्मण उत्तम काठोळे व आरोपी क्र. ४ रविंद्र सुरेश कोठाळे, यांची भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम २९४, ३२३ व ५०६ सह कलम ३४ प्रमाणे शिक्षापात्र आरोपांतून फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २५५(१) अन्वये

निर्दोष मुक्त करण्यात येते.

**२.** आरोपींचे जामीनकदबा रद्द करण्यात येतो.

**३.** अपिल दाखल झाल्यास आरोपी क्र. १ ते ४ यांनी त्यात हजर राहण्याची हमी म्हणून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(१) (अ) च्या पुर्ततेसाठी सहा महिन्यांच्या कालावधीसाठी प्रत्येकी रुपये १५,०००/– चे वैयक्तीक बंधपत्र व जामीनपत्र द्यावे.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)**

sd/–

चिखली **(आय.ए.वाय.ए.खान)**

दिनांक – २३/०६/२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, चिखली